**MHAU080006832026**

**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२०२६**
**सुभाष शेजुळ वि. नारायण घुले**

**<u>निशाणी क्र.७ खालील ई–आदेश</u>**

१) प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी वाद मिळकतीसंदर्भात जैसे थे ठेवा परिस्थिती ठेवण्यासाठी अर्ज सादर केला आहे. प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी या अर्जावर आपले म्हणणे सादर केले नाही.

२) वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. देशपांडे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

३) वादीचा अर्ज अभिलेखावर दाखल कागदपत्रे याचे अवलोकन केले. वाद मिळकतीसंदर्भात वादींनी वादी हा मिळकतीचा मालक व ताबेदार आहे याबाबत जाहिर ठरावाचा वाद मिळकती सदंर्भात झालेला फेरफार क्रमांक ५७७ रद्द बातल करणे बाबतचा व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यासोबत जी कागदपत्रे सादर केली, त्यातील ७/१२ उता–याच्या प्रतीचे अवलोकन करता, त्यामध्ये सर्व वादींची नावे दिसुन येत नाही. वादीने नि.क्र.५ च्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.६ दुय्यम निबंधक यांनी वाद मिळकती संदर्भात कोणाच्याही नावे नामनिर्देशन मंजुर नाही अशी तुतातुर्त ताकीद मागितली आहे. जी काही महसूल दप्तरी कारवाई झाली त्याअनुषंगाने निर्णय झाले त्याची अंमलबजावणी करण्याचे काम हे महसूल अधिका–यांचे आहे. सदयस्थितीत त्यामध्ये हस्तक्षेप करणे न्याययोग्य नाही. वादीने वाद मिळकत प्रत्यक्ष त्याच्या ताब्यात आहे किंवा नाही हे दोन्ही बाजुने दाखल कागदपत्रांवरुन व पुराव्यावरुन ठरेल. करिता सद्यस्थितीत अर्ज मंजुरीस सबळ कारण नाही. करिता, आदेश.

**आदेश**

वादीचा अर्ज (नि.क्र.७) नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2026.07.01 17:19:26 +0530

(सु. श. देशमुख)
दि.०१.०७.२०२६. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिल्लोड.